## भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.३६/२०१४
## निशाणी क्र.१८ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवाला क्र.३ ने दि.११/०१/२०२४ रोजीचा रेफरेन्स एकतर्फा चालविण्याचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याबाबतची  करणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व अर्जदाराने दिलेले म्हणणे वाचले. सामनेवाला क्र.३ तर्फे वकील सौ. धनश्री कामत व अर्जदार तर्फे वकील कु. प्रिती जंगम यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. सामनेवाला क्र.३ चे कथन की, अर्जाचे समन्स दिनांक १२/१२/२०२३ रोजी प्राप्त झाले होते. परंतु, समन्समध्ये निर्देशीत केलेल्या दिनांकास सामनेवाला क्र.३ तर्फे वकील प्राधिकृत करणेबाबत वरिष्ठ कार्यालयातून कारवाई करण्यास विलंब झाला. सदर कारणे नेमलेल्या तारखेस सामनेवाला क्र.३ व वकील हजर होऊ शकले नाही. परिणामी, सामनेवाला क्र.३ विरुध्द दिनांक ११/०१/२०२४ रोजी अर्ज एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित झाला. सामनेवाला क्र.३ तर्फे हजर होण्यास मुद्दाम विलंब झालेला नाही. सामनेवाला क्र.३ ला कैफियत मांडणे न्यायाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. एकतर्फा आदेश रद्द होऊन कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास सामनेवाला क्र.३ चे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, बचावाची संधी द्यावी अशी विनंती केली.

०४. अर्जदारची अर्जास हरकत असून सामनेवाला क्र.३ ने दिलेले अर्जातील कारण हे संयुक्तीक नसल्याचे कथन केले. विकल्प योग्य तो आदेश व्हावा अशी विनंती केली.

०५. सामनेवाला क्र.३ यांचा अर्ज, अर्जदारचे म्हणणे व उभयपक्षातर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. मुळ अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १८ अन्वये भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.३ व अर्जदार यांचे प्रस्तुत वादामध्ये आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याचे स्पष्ट होते. सामनेवाला क्र.३ ने मुदतीत तारखेस हजर होऊन मुदतीत कैफियत न देण्याबाबत अर्जात दिलेली कारणे संयुक्तीक दिसुन येते. मुळ अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.३ ला त्याची बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. सामनेवाला क्र.३ विरुध्द दिनांक ११/०१/२०२४ रोजी झालेला प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जाचा निकाल गुणदोषावरुन उभय पक्षातील वादाला पुर्णविराम मिळेल. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.३ विरुध्द दिनांक ११/०१/२०२४ रोजी रेफरन्स अर्ज एकतर्फा चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो व त्यास कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/-

**(पी. एम. उन्हाळे)**
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड

महाड
दिनांक १४/०३/२०२४